# L&T Public Charitable Trust hands over drinking water projects to tribal of Palghar

| Publication : Maharashtra Times | Edition : Vasai, Virar & Palghar |
| --- | --- |
| Date : July 5, 2019 | Page: 02 |

# आदिवासींची पाण्यासाठी वणवण थांबली

उषा पाटील



म. टा. वृत्तसेवा, पालघर

जिल्हा परिषद आणि एल अँड टी पीसी ट्रस्टतर्फे पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील आदिवासी पाड्यात पिण्याच्या पाण्याचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आल्याने आदिवासी महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट थांबणार आहे.

आज पालघर जिल्ह्यातील तलासरी ब्लॉकमधील बोरमाळ ग्रामपंचायतीत येणाऱ्या सुथेडपाडा आणि भेंडीपाडा या गावांतील पिण्याच्या पाण्याच्या दोन शाश्वत प्रकल्पांचे हस्तांतरण करण्यात आले. ग्रामऊर्जेच्या सहकार्याने हे पिण्याच्या पाण्याचे

## जिल्हा परिषद आणि खासगी ट्रस्टतर्फे प्रकल्प कार्यान्वित

प्रकल्प राबवण्यात आले असून नंतर स्थानिक ग्रामपंचायतीला त्याचे वितरण करण्यात आले.

एलटीपीसीटीची भागीदार ग्रामऊर्जातर्फे हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर, जिल्हा परिषद, पालघर, एलटीपीसीटीचे विश्वस्त आणि स्थानिक उपस्थित होते. हस्तांतरण कार्यक्रमात पंचायत समिती तळासारी (ब्लॉक स्तरीय) आणि ग्रामपंचायत (गाव स्तरीय) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला.

या प्रकल्पामध्ये नव्या कूपनलिका, सौरऊर्जा पाण्याचे पंप, पाइपलाइन, पाण्याची टाकी, वितरण पाइपलाइन आणि पाणी वितरण स्टँड यांचा समावेश आहे. या प्रकल्पाअंतर्गत एकूण १० स्टँड पोस्ट्स उभे करण्यात आले आहेत. आता एआरडीडब्ल्यूपी मापदंडानुसार गावातल्या प्रत्येक घरासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

पिण्याच्या पाण्याच्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दोन गावांचा समावेश करण्यात आला होता व यापुढे पालघर जिल्ह्यातील तलासरी ब्लॉकमधील आणखी गावांना त्यात सहभागी करून घेतले जाणार आहे. पाण्याचा खात्रीशीर स्त्रोत, पाण्याचा दर्जा, पाण्याची मागणी आणि पाणी काढण्यासाठी स्त्रियांना सहन करावा लागणारा त्रास इत्यादी बाबी लक्षात घेऊन सुथेडपाडा आणि भेंडीपाड्यासाठी पिण्याच्या पाण्याची यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे.

याप्रसंगी पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर म्हणाले, 'सरकार आणि एल अँड टीमध्ये झालेले हे अशाप्रकारचे सहकार्य दुर्मिळ आहे. स्थानिक सरकार, पंचायतीशी सल्लामसलत करून शोधण्यात आलेल्या समस्या व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या उपाययोजना आणि तळागाळाशी असलेले संबंध या सर्व प्रकल्पांमध्ये दिसून येतात.'

| Publication : Sakal | Edition : Palghar |
|---|---|
| Date : July 6, 2019 | Page: 03 |



# ‘एल अॅण्ड टी ट्रस्ट’तर्फे टंचाईग्रस्तांना पाणीवाटप

## तलासरीतील पाड्यांत ११ स्टँडपोस्टद्वारे पुरवठा

विरार, ता. ५ (बातमीदार) : तलासरी येथील कोचई-बोरमाळ ग्रामपंचायतीमधील सुथेडपाडा आणि भेंडीपाडा आदी पाणीटंचाई असलेल्या पाड्यांमध्ये एल अॅण्ड टी ट्रस्टतर्फे स्टँडपोस्टद्वारे पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. यात एकूण ११ स्टँडपोस्टद्वारे ६६९ नागरिकांना पाणीवाटपाची सोय करण्यात आली आहे. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी या उपक्रमाचे उद्‌घाटन केले.

‘एल अँड टी ट्रस्ट’तर्फे या वेळी नववी आणि दहावीचे वर्ग सुरू करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून परवानगी मिळालेल्या तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांपैकी कवाडा-ठाकरपाडा आणि करजगाव-पाटीलपाडा शाळेमध्ये प्रत्येकी दोन वर्गखोल्या बांधून दिल्या. या उपक्रमाचा फायदा दोन्ही शाळांमधील एकूण ३७७ विद्यार्थ्यांना होणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी बोरीकर यांनी या दोन्ही योजनांचे उद्‌घाटन करण्याचा मान पाड्यातील ग्रामस्थ आणि शाळेतील विद्यार्थ्यांना दिला.

एल अॅण्ड टी ट्रस्टचे विश्‍वस्त के. रामक्रिष्णन यांनी या वेळी दोन्ही शाळांमधील नववी आणि दहावीच्या मुलांना पुस्तक संच पुरविण्याची घोषणा केली. या वेळी गटविकास अधिकारी राहुल म्हात्रे, सभापती सविता डावरे, उप-सभापती वनशा दुमाडा, एल अॅण्ड टी ट्रस्टतर्फे ट्रस्टप्रमुख गायत्री ओलेटी, ट्रस्ट सचिव प्रमोद निगुडकर, सरपंच आदी उपस्थित होते.

